# चैतन्य साधना

॥अशक्य ही शक्य॥

श्री स्वामी समर्थ



## भक्त कैवारी स्वामी समर्थ

स्वामीमहाराजांबद्दल, १८५६ ते १८७८ या बावीस वर्षांच्या कालखंडात केव्हढा परमादर नांदत होता आणि त्यांचे दर्शन होताच त्या काळातील विविध जातीजमाती-समाजांमधील मंडळी किती भारावून जात, हे त्यांच्या शिष्यांनी आपापल्या परिसरात त्या वेळी उभ्या केलेल्या मठांवरून पाहता येते. ही सारी मंडळी एका राज्यातील नव्हती. कोणी कर्नाटक, कोणी गुजरात, कोणी वंगुर्ल्यापासून नागपूरपर्यंतचे. माझ्या गेल्या काही दशकांमधील भ्रमंतीत त्यातील कित्येक मठ मी पाहिले. त्यात मराठवाड्यातील केज असो की नगरमधील असो, चिपळूणच्या मार्कंडीतील असो की वेंगुर्ले कॅम्पमधील, बिलिमोरा, सुरत, बडोदे असे गुजरातेतील असोत; एक ध्यास म्हणून तेथे सतत जात-येत राहिलो. प्रत्येक मठामागे एक सद्‌भक्त, एक सत्पुरुष वा अध्यात्मातील मोठे व्यक्तिमत्त्व पाहता येते. स्वामींनी त्यांच्या विलक्षण सामर्थ्याने साऱ्यांना आपल्याकडे खेचून घेतले. त्यातीलच पुढील रोमांचक हकीकत. चिपळूणमधील बहादूरशा नाक्याकडून चिंचनाक्याकडे जाणाऱ्या गावातील मुख्य रस्त्यावर उजवीकडे मार्कंडीचा स्वामी समर्थांचा मठ आहे. स्वामींचे परमभक्त श्रीगोपाळबुवा केळकर यांनी तो स्थापन केला. या मठात मी चार-पाच वेळा जाऊन आलो आहे. गोपाळबुवा हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील. त्यांना पोटाचा विकार होता. त्यांनी खूप उपचार केले; पण आजार हटेना. शेवटी सर्व ईश्वरावर सोपविले. आजार बरा झाल्यास सर्व कामधंदा सोडून ईश्वराच्या अर्थात सत्पुरुषाचे सेवेत उर्वरित आयुष्य घालवण्याचा निर्णय केला. तसे ते बरे झाले. त्या नंतर त्यांनी विचारपूर्वक अक्कलकोटचा रस्ता धरला. स्वामींची कीर्ती त्या वेळी देशभर पसरलेली. खासबागेत स्वामी नेहमीप्रमाणे आले होते. गोपाळबुवांना तेथे त्यांचे दर्शन झाले. जवळ पैसे असे नव्हतेच. त्यामुळे मधुकरी मागून निर्वाह आणि स्वामींचे दर्शन असा कार्यक्रम त्यांनी चालवला. पुढे स्वामींनी त्यांना स्वप्नदर्शनही दिले, अनुग्रहही केला. एकदा अशी घटना घडली की त्यांना आंघोळीसाठी ब्राह्मणांनी भांडे मागून दिले नाही. त्यांनी अन्य एका व्यक्तीकडून घेतले. त्या काळी जाती-पातीचे प्रस्थ होते. कोण्या एका बळवंतराव नावाच्या गृहस्थाने गोपाळराव बाटले हे पाहताच टोचून बोलण्यास सुरुवात केली. इतकेच नव्हे तर, ते भंडाऱ्याच्या निमित्ताने जेवावयास बसले असता बळवंतरावांनी 'हा बाटलेला' म्हणून गोपाळरावांचे पान पंक्तीतून बाजूला ठेवायला लावले. ही आपली अप्रतिष्ठा म्हणून गोपाळरावांना अतिदु:ख झाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले! कोणत्याही मोठ्या भंडाऱ्यात भंडारा घालणारे जे कोणी ते, स्वामी समर्थांचे पानही स्वतंत्रपणे नैवेद्य म्हणून वाढून ठेवत. स्वामी कधी जेवावयास येत, कधी येत नसत. या वेळी ते आले नाहीत. त्यांचे नैवेद्याचे पान (ताट) समर्थांकडे लोक घेऊन गेले. लगेचच स्वामींची मुद्रा उग्र झाली. ते तीन-चार वेळा म्हणाले, ''आम्ही बाटलो. आम्हाला शिवू नका. आम्ही जेवत नाही.'' स्वामी त्या नंतर सायंकाळपर्यंत रागातच होते. ते पुढे रात्री जेवले. हे सारे आपल्यासाठी हे लक्षात घेऊन गोपाळरावांना पुनश्च अश्रू आवरेनात. त्यांनी स्वामींच्या पायांवर मस्तक ठेवले. उपद्रवकारी बळवंतरावांचे दिवस या नंतर फिरले! गोपाळराव या नंतर काही काळ अक्कलकोटला होते. पुढे स्वामीसुतांनी (या पूर्वी म्हटल्याप्रमाणे हे स्वामींचे अनन्यभक्त होते, त्यांनी मुंबईस कांदेवाडीत मठस्थापना केली.) गोपाळरावांसाठी स्वामींच्या पादुका ब्रह्मचारीबुवांनी (हे कांदेवाडीच्या मठात होते) चिपळूणला आणून दिल्या. त्याच आज तेथील मठात आहेत. सन १८७४ मध्ये गोपाळरावांनी पादुकांची सर्वतोपरी पूजाअर्चा प्रारंभ केली, ती आजपर्यंत मठात चालू आहे. स्वामी समर्थांनी सर्वांना आपलेपणाने वागवले, भेदाच्या खोट्या कल्पना मुळातून उखडवून भक्तांना पोटाशी धरले, त्याचे गोपाळराव केळकर हे उदाहरण. (सुरत-वेंगुर्ले मठ पुढील लेखात.)



एस. के. कुलकर्णी

**क्रमश :**

**(उद्याच्या अंकात जीवनविद्या मिशन)**

## विलेपार्ले येथे कार अपघातात तरुणाचा मृत्यू

**प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - विलेपार्ले येथे भरवेगात जाणाऱ्या कार अपघातात अकुल्ला हनीफ साकियान या तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर शीव व मुलुंड येथील अन्य दोन अपघाताच्या घटनेत एका वृद्धासह महिला जखमी झाली. याप्रकरणी नवघर पोलिसांनी आरोपी कारचालकास अटक केली तर दोन गुन्ह्यांतील कारचालक अपघातानंतर पळून गेल्याचे पोलिसांनी सांगितले. रविवारी रात्री सव्वातीन वाजता विलेपार्ले येथील पश्चिम दुतग्रती महामार्गावरील सेंटॉर ब्रिजवर एका भरवेगात जाणाऱ्या कारने दुसऱ्या कारला धडक दिली होती. या अपघातात अकुल्ला हा तरुण जखमी झाला. त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी विलेपार्ले पोलिसांनी अपघाताची नोंद केली आहे. दुसरा अपघात शनिवारी रात्री पावणेदहा वाजता शीव येथे झाला. ललिता राजेश ओंबळे ही महिला धारावी परिसरात राहते. ती रस्ता क्रॉस करीत होती. यावेळी एका कारने तिला धडक दिली. त्यात ती गंभीर जखमी झाली होती. अपघातानंतर कारचालक तेथून पळून गेला होता. मुलुंड येथील तिसऱ्या अपघातात दत्तू रामय्या गुडा हे वृद्ध जखमी झाले. दत्तू हे नवी मुंबईतील बेलापूर येथे राहतात. शनिवारी दुपारी पावणेदोनववाजता ते त्यांची रिक्षा मुलुंड ऐरोली वाहिनीवर यु टर्न घेत होते. यावेळी एका कारने त्यांच्या रिक्षाला धडक दिली होती. याप्रकरणी नवघर पोलीसांनी आरोपी कारचालकास अटक केली.

## भाऊ नारकर यांच्या चरित्राचे प्रकाशन

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी)- परिवर्तन मुंबई व भाऊ नारकर स्मृती समिती आयोजित व्याख्यान व ग्रामविकास महर्षी नारकर भाऊ या जीवन चरित्राचे प्रकाशन रविवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा कार्यक्रम सुरेंद्र गावस्कर सभागृह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पू.) येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजित केला आहे. यावेळी ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे हे 'गांधी व आंबेडकर' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. सुभाष वारे भूषवणार आहेत.

# बीड जिल्ह्यात भाजपचेच वर्चस्व

## राष्ट्रवादी काँग्रेसचे धस भाजपच्या मार्गावर

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - बीड जिल्ह्यातील ६५ टक्के ग्रामपंचायती या भाजपकडे आल्या असून परळी तालुक्यात आम्ही थोडे कमी पडलो तरी, राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेल्या भाजपने बिनविरोध जिंकल्या आहेत. असा दावा ग्रामविकास, महिला बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांशी अनौपचारीक गप्पा मारताना केला.

दरम्यान अष्टी तालुक्यातील माजी मंत्री सुरेश धस हे सध्या पंकजा मुंडेंच्या निकटवर्तीयात गणले जात आहे. ते लवकरच मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांच्या संमतीने भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे धस यांनी दिलेल्या एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे.

बीड जिल्ह्यातील भगवान गडावरील दर्शन सोहळा व त्यावरील आलेले निर्बंध त्या विरोधात सावरगाव येथे पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेला दसरा मेळावा व ग्रामपंचायत निवडणूका यावर आपण गेले महिनाभर लक्ष केंद्रीत केले होते. राष्ट्रवादीकडे पूर्वांपार असलेल्या ग्रामपंचायती भाजपाकडे आल्या आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विरोधी पक्ष नेते धनंजय मुंडे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वरद-हस्त आहे का? असे विचारले असता पंकजा मुंडे म्हणाल्या, तसे मुळीच नाही. शेवटी पक्ष वाढवायचा असेल तर आम्ही सर्वजण एकत्र आहोत. ते विरोधीपक्ष नेते असल्याकारणाने बाहेर तशी हवा पसरवतात. मात्र, त्यात तथ्य नाही, असेही मुंडे म्हणाल्या.

विरोधी पक्ष नेते धनंजय मुंडे हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे बोलले जाते. यावर विचारले असता पंकजा मुंडे म्हणाल्या, मला त्याची कल्पना नाही. मात्र तेही भाजपच्या चाकोरीत वाढले आहेत. हे नाकारता येणार नाही. धनंजय मुंडे हे माझे विरोधक नाहीत. मग मी त्या संदर्भात त्यांच्याबद्दल चर्चा का करावी, असा सवालाही त्यांनी केला.

बीड जिल्ह्यातील ८० ते ९० टक्के सत्तास्थानी सध्या भाजपकडे आहेत. जिल्हा बँक, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आता ग्रामपंचायतीमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले आहे. परळी नगरपालिका व परळीचा विभाग हा गोपीनाथराव मुंडे असतानाही आमच्यामागे नव्हता. तिथे भावकीचे राजकारण आहे. परळीमध्ये धनंजय व माझे चुलते सरपंच होते. पूर्वीपासून हे सत्तास्थान आमच्या घराण्याकडे असल्याने हा भावकीचा प्रश्न होता.

सुरेश धस पाठोपाठ राष्ट्रवादीचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर हे भाजपमध्ये लवकरच येणार असल्याची चर्चा आहे.

त्यावर पंकजा मुंडे म्हणाल्या, जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणूकीत त्यानी आम्हाला मदत केली. जिल्ह्यातील ते बडे नेते आहेत. त्यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. मात्र ते भाजपमध्ये येणार याबाबतची कुठलीही चर्चा नाही.

**८५ ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व**

राष्ट्रवादीचे माजी मंत्री सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेऊन तीन दिवसापूर्वी मी अजित पवार यांना स्पष्टपणे सांगितले की, मी तुमच्याबरोबर नाही असे सांगून भाजपला उघडपणे मदत केली. आताही भाजप प्रवेशाचा निर्णय मुख्यमंत्री पालकमंत्र्यांशी चर्चा करून घेणार आहेत. आमदार भिमराव धोंडे यांच्यावर निशाणा साधून धस पुढे म्हणाले, नुकताच अष्टी तालुक्यातील ८५ ग्रामपंचायतांचा सत्कार केला. हे लक्षात घेता भिमराव धोंडे यांचे वर्चस्व राहिले कुठे असा सवाल धस यांनी केला. धोंडे यांना मी दोन वेळा विधानसभा निवडणूकीत पराभूत केले होते.

**यापुढे हार-तुरे स्वीकारणार नाही!- पंकजा मुंडे**

हमारी मुठ्ठीमे आकाश सारा, जभभी खुलेगी चमकेगा तारा' ही प्रार्थना मुंबईतील बाल आशा ट्रस्ट वात्सल्य फाऊंडेशन अनाथ मुलांनी म्हटल्यानंतर महिला बालविकास मंत्री पंकजा मुंडे अंतर्मुख झाल्या.

याच प्रार्थनेने प्रभावीत होऊन त्यांनी यापुढे हार-तुरेंचा सत्कार न स्वीकारण्याचा त्यांनी जाहीर केला. अनाथ बालकांना यापुढे हार-तुऱ्यातून येणारा सर्व निधी देण्याचे ठरवले आहे, असे मुंडे यांनी सांगितले.

# मनसेच्या २२ कार्यकर्त्यांना अटक

## मुंबई, ठाण्यात फेरीवाल्यांना दमदाटी

**प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - फेरीवाल्यांना धक्काबुक्की करुन दमदाटी केल्याप्रकरणी मनसेच्या सहा कार्यकर्त्यांना काल वाकोला पोलिसांनी अटक केली. या सर्वांची प्रत्येकी पाच हजार रुपयांच्या जामिनावर सुटका केली आहे.

अखिल चित्रे, संदेश गायकवाड, हेमंत गायकवाड, विनल दर्हिकर, चंद्रशेखर माडव, विशाल शिरवडकर अशी सहाजणांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले. काल रात्री साडेआठ वाजता मनसेच्या कार्यकर्त्यांनी सांताक्रुझ येथील स्टेशन रोडवरील काही फेरीवाल्यांविरुद्ध धडक मोर्चा काढला होता.

यावेळी या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करुन तिथे असलेल्या काही फेरीवाल्यांना शिवीगाळ करुन दमदाटी करण्यास सुरुवात केली. काही वेळाने त्यांनी काही फेरीवाल्यांना धक्काबुक्की केली आणि नंतर त्यांचे स्टॉलची तोडफोड केली होती. त्यामुळे परिसरातील वातावरण तंग झाले होते.

मनसे कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीमुळे तिथे असलेल्या काही फेरीवाल्यांनी पळ काढला होता. ही माहिती मिळताच वाकोला पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

यावेळी एका फेरीवाल्याने या कार्यकर्त्यांविरुद्ध तक्रार केल्यानंतर संबंधित सर्व कार्यकर्त्यांविरुद्ध वाकोला पोलिसांनी विविध भादवी कलमांतर्गत गुन्हा नोंदविला होता. गुन्हा दाखल होताच अखिल चित्रे, संदेश गायकवाड, हेमंत गायकवाड, विनल दर्हिकर, चंद्रशेखर माडव, विशाल शिरवडकर या सहा मनसे कार्यकर्त्यांना वाकोला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्यांना वांद्रे न्यायालयात हजर करण्यात आले होते, यावेळी त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. मात्र नंतर त्यांच्या जामिन अर्जावर सुनावणी होऊन या सर्वांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचा जामिन मंजुर झाला होता.

**ठाण्यात पाच जणांना अटक**

मनसेचे शहर अध्यक्ष अविनाश जाधव यांच्यासह ५ जणांना ठाणे पोलीसांनी अटक केली आहे. मनसैनिकांनी ठाण्यात फेरीवाल्यांविरोधात खळ्ळ-खटॅक आंदोलन सुरू केले. ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांच्या स्टॉल्सची तोडफोड करत मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना हटवलं.

मनसेच्या कार्यकर्त्यांच्या अटकेचे वृत्त येताच नौपाडा पोलीस ठाण्यासमोर मोठी गर्दी झाली होती. मनसेच्या आंदोलनानंतर गेले तीन दिवस तरी फेरीवाले गायब असल्याने प्रवाशांना विना अडथळा रेल्वे स्थानकातून बाहेर पडता येत आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांची अडचण दूर झाल्यामुळे प्रवाशांमध्ये या आंदोलनाबाबत सहानुभूती आहे. मात्र, फेरीवाल्यांवर कारवाई होत असल्याने ते नाराज आहेत.

राज ठाकरे यांनी फेरीवाल्यांना हटवायला पालिकांना १५ दिवसांची मुदत दिली होती.

## गुन्हेगाराची गळफास लावून आत्महत्या

मुंबई,सोमवार (प्रतिनिधी) - चोरी, जबरी चोरीसह अन्य गंभीर गुन्ह्यांतील एका रेकॉर्डवरील गुन्हेगार कृष्णा गोपाळ देवेंद्र (२५) याने कालघरात गळाला फास लावून आत्महत्या केल्याची घटना ॲण्टॉप हिल परिसरात उघडकीस आली आहे.

दारुच्या नशेत पत्नीसोबत झालेले भांडण आणि भांडणानंतर पत्नी माहेरी निघून गेल्याने त्याने आत्महत्या केल्याचे बोलले जाते. याप्रकरणी ॲण्टॉप हिल पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. कृष्णा हा ॲण्टॉप हिल येथील शीव-कोळीवाडा परिसरात राहत होता. दारु पिण्यावरुन त्याचे त्याची पत्नी धनलक्ष्मीसोबत नेहमीच भांडण होत होते. काल रात्री तो पुन्हा मद्यप्राशन करुन घरी आला. यावेळी त्याने त्याच्या आईसह भावासोबत भांडण केले होते. या भांडणामुळे तिथे प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. त्यानंतर तो पोटमाळ्यावर असलेल्या घरी झोपण्यासाठी निघून गेला. सोमवारी सकाळी दहा वाजता त्याच्या भावाला त्याने घरात गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिसून आले.

# ५०० शिक्षकांचा पगार ५ महिन्यांपासून रखडला

## रात्रशाळेकडे सरकारचे दुर्लक्ष

**प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देणार्या रात्रशाळांतील तब्बल ५०० शिक्षकांचा पगार गेल्या ५ महिन्यांपासून रखडलेला असल्याची गंभीर बाब आज उघड झाली. या रात्रशाळांमध्ये कार्यरत असणारे शेकडो शिक्षक पूर्णवेळ ड्युटी करत असतानाही शासनाकडून केवळ अर्ध्या वेळ ड्युटीचाच पगार दिला जात आहे. याबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्यानंतर देखील राज्य सरकारकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप शिक्षकांकडून केला जात आहे.

राज्य सरकारच्या वतीने मे महिन्यात काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार शासनाच्या वतीने रात्रशाळांमधील शिक्षकांना पूर्ण वेळ ड्युटीचे आदेश देण्यात आले होते. मात्र तरीही शासनाकडून शिक्षकांना केवळ अर्ध्या वेळ ड्युटीचाच पगार दिला जात आहे. या शिक्षकांना सर्वसाधारणपणे २० हजार रुपयांच्या आसपास पगार दिला जातो.

यासोबतच रात्रशाळांतील शिक्षकांना इतरांप्रमाणे अन्य शासकीय सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले असून पेंशनाबाबतही शासनाकडून अन्याय केला जात असल्याची ओरड शिक्षकांकडून केली जात आहे. केवळ शिक्षकांवरच नाही तर रात्रशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांकडे शासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.

या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने सांगितले की, रात्रशाळेत शिकणाऱ्या मुलांना निधी अभावी शैक्षणिक उपक्रमांना मुकावे लागते. आमच्या शाळेत अभ्यासाव्यतिरिक्त कोणतेही अन्य उपक्रम होत नाहीत.

# दिवाळीत साईबाबांना चार कोटींची आभूषणे

**विशेष प्रतिनिधी**



मुंबई, सोमवार - यावर्षी दिवाळीत जगभरातून हजारो साईभक्त दाखल झाले होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी साईबाबांच्या मूर्तीवर जवळपास ४ कोटी २२ लाख रुपयांचे आभुषणे घालण्यात आली होती. त्यामध्ये सुवर्णजडीत शाल, हिरेजडीत रत्नमुगुट, सोन्याचे अलंकार घालण्यात आले होते. हे सर्व भक्तांच्यादृष्टीने आकर्षक ठरले. या ऐवर्षसंपन्न मोठ्या पारंपारीक पध्दतीने करण्यात आले. साकोरी येथील उपासनी महाराज देवस्थानकडून बाबांना सोन्याचे ब्रेसलेट व सोन्याची अंगठी गुरुदक्षीणा म्हणून चढविण्यात आली.

यावेळी शिर्डीच्या देवस्थानाच्या संपत्तीची माहिती पुढे आली आहे शिर्डीच्या साईबाबा संस्थाकडे १५००० कोटीचे डिपॉझिट बँकेत आहेत. ३८० किलो सोने, ४५०० किलो चांदी, १० कोटी रुपयाचे हिरे आहेत.

ही संपत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. शिर्डीची कीर्ति देश-विदेशात वाढत आहे. रोज सरासरी १ लाख भाविक शिर्डीदरबारी हजेरी लावतात. उत्सवाच्या काळात ही संख्या पाच ते १० लाखांच्यावर जात असते. जगभरातून येणारे साईभक्त साई चरणी मोठे दान करत असतात.

यावर्षी प्रथमच जगभरातून आलेल्या साईभक्तानी दिवाळी साजरी केली. लक्ष्मीपूजनाला ९५ वर्षाची परंपरा आहे. शिर्डीमध्ये चारही दिवस भक्तांच्या दानातून कुबेराची झोळी बनली होती. चारही दिवस साईबाबांच्या मूर्तीस मंगलस्नान घालण्यात आले.

विशेष म्हणजे चांदीच्या कमळात असलेल्या महालक्ष्मीचे चौगडा, मृदुंगाच्या तालात पुजन करण्यात आले.

सुवर्णजडित शालीचे महत्व

दिपावली निमित्त साईबाबांच्या समाधीवर सुवर्णजडित शाल हे या दिवाळीत आकर्षण ठरले.

# सात लाख रुपयांच्या चोरीप्रकरणी नोकराविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - सात लाख रुपयांच्या चोरीप्रकरणी नोकराविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. हा नोकर पळून गेल्याने त्याच्या अटकेसाठी आता पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली आहे. केसवन सोमा सुंदरम हे डोंबिवली येथे राहत असून अंधेरीतील स्पाईसजेट लिमिटेड या दुकानात कामाला आहेत. आरोपी नोकराने १७ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत दुकानातून सात लाख रुपयांचे टायटनच्या १५ हून अधिक महागडी घड्याळयांची चोरी केली होती. हा प्रकार काल उघडकीस येताच केसवन सुंदरम यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी नोकराविरुद्ध चोरीच्या गुन्ह्यांची नोंद करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

**घरफोडीच्या दोन गुन्ह्यांत साडेआठ लाखांची लूट**

घरफोडीच्या दोन गुन्ह्यांत साडेआठ लाख रुपयांची लूट झाल्याची घटना विक्रोळी आणि मालाड परिसरात घडली. विक्रोळी येथे प्रकाश गंगाधर घोक्षे यांच्या घरात काल दुपारी त्यांच्या घरातील कुलूप तोडून काही चोरट्यांनी घरात प्रवेश मिळविला होता. या चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम ६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल पळवून नेला. सायंकाळी सात वाजता हा प्रकार त्यांच्या लक्षात येताच त्यांनी विक्रोळी पोलिसांना ही माहिती दिली होती.

दुसरी घरफोडीची घटना मालाडच्या मालवणी परिसरात घडली. श्योमन ॲथोनी फुराडे ही महिला मढ जेट्टी, व्हॅनीला तलावाजवळ राहते. तीन दिवस फुराडे कुटुंबिय हे मुंबईबाहेर होते. यावेळी घरात कोणीही नसल्याची संधी साधून काही अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश मिळवून ११३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि एक मोबाईल असा २ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केला होता. याप्रकरणी मालवणी आणि विक्रोळी पोलिसांनी दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद करुन आरोपींचा शोध सुरु केला आहे.

## क्राईम डायरी

**कांदिवलीतील मोबाईल चोरास अटक**

कांदिवलीत एका मोबाईल दुकानातील शटर तोडून सुमारे साडेसात लाख रुपयांचे विविध कंपनीचे मोबाईल चोरी करुन पळून गेलेल्या आरोपीला कांदिवली पोलिसांनी अटक केली. अविनाश पवार असे या आरोपीचे नाव असून अटकेनंतर त्याला बोरिवलीतील स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयाने २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.त्याच्याकडून पोलिसांनी पावणेचार लाख रुपयांचे चोरीचे मोबाईल हस्तगत केले.

कांदिवलीतील एकतानगरात प्लाझा इलेक्ट्रॉनिक्स हे दुकान आहे. २० ऑक्टोबरला या दुकानातील मागील शटर तोडून दुकानातील विविध कंपनीचे ६६ हून अधिक महागडे मोबाईल चोरट्यांनी पळवून नेले होते. दुसऱ्या दिवशी हा प्रकार उघडकीस येताच दुकानाच्या मालकाने कांदिवली पोलिसांत चोरीची तक्रार केली.

याप्रकरणी चोरीचा गुन्हा नोंद होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकूंद पवार यांच्या पथकाने अविनाश पवार याला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. पोलीस चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली.या मोबाईलची किंमत ३ लाख ८१ हजार रुपये आहे. याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत आहे.

**गावदेवी येथे कामगाराची हत्या**

गावदेवी येथे संजयकुमार उपेंदर पासवान (४०) या कामगाराची त्याच्याच सहकाऱ्याने लाथ्याबुक्क्यांनी तसेच लाकडी दांड्याने बेदम मारहाण करुन हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली.

संजयकुमार पासवान हा चुन्नाभट्टी येथील गणेश मंदिराजवळील त्रिमूर्ती चाळीजवळ राहतो. गुरुवारी क्षुल्लक कारणावरुन त्याचे त्याच्या सहकाऱ्यांसोबत वाद झाला होता. या वादातून त्यांनी त्याला लाथ्याबुक्क्यांनी तसेच लाकडी दांड्याने बेदम मारहाण केली होती. त्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र तेथे त्याचा मृत्यू झाला होता.

# स्वागत दिवाळी अंकांचे !

**चिंतन आदेश**

दरवर्षी वेगळ्या धाटणीचे विषय घेऊन दिवाळीचा साहित्य गोडवा वाढविणाऱ्या 'चिंतन आदेश'ने यंदाच्या दिवाळी अंकाला 'प्रेम' विशेषांकाचा भरजरी साज चढविला आहे. 'ज्योत से ज्योत जलाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो....' हे गाणे गुणगुणत हा अंक वाचकांना 'प्रेमाच्या गावा' घेऊन जातो. आध्यात्म, साहित्य, संस्कृती, काव्यच नव्हे तर पती-पत्नी, आईवडील-मुले, मित्र-मैत्रीण अशा विविध नात्यातील प्रेमासंबंधीचे कंगोरे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न या अंकातून करण्यात आला आहे. 'प्रेमसंबंध: नव्या समजुतीची गरज - सुरेश द्वादशीवार, प्रेम आणि प्रेम - अरविंद व्यं. गोखले, प्रेम कोणावरही करावे - अरुण खोरे, प्राणसखा पाऊस - डॉ. प्रतिमा इंगोले, प्रेमाची स्वर्गीय मैफल - प्रदीप निफाडकर' अशा विविध मान्यवरांनी आपल्या प्रेमभावना व्यक्त केल्या आहेत. याशिवाय, या अंकात डॉ. सदानंद मोरे, मिताली लिमये, कविता क्षीरसागर, सुनिती लिमये यांच्या प्रेमकवितांचीही बहारदार मैफल जमली आहे. प्रेमाच्या नानाविध छटांनी हा अंक सजला आहे.




**चिंतन आदेश**

संपादक - अभिनंदन थोरात

मूल्य - १००

**ग्रहवेध**

ज्योतिष्य विषयाला वाहिलेला 'ग्रहवेध' हा दिवाळी अंक वाचनीय झालेला आहे. या दिवाळी अंकात 'रश्मीबल' या विषयावर खास लेख लिहिलेला आहे. ज्या पत्रिकेत ज्या ग्रहाचे रश्मीबल अधिक, त्या ग्रहाचा प्रभाव व्यक्तीच्या व्यवसायावर व समाजातील स्थानावर होत असतो. 'पितृश्राद्ध-पितृऋण-पितृदोष आणि ज्योतिषशास्त्र' या विषयावरील लेखात पितृपक्षाचे विवेचन करणारा शास्त्रशुद्ध लेख आहे. 'सातव्या स्थानातील शनि, वैवाहिक सौख्य आणि 'लाल किताब'मधील उपाय यात विवाहविषयक वेगळ्या उपाययोजना सांगितल्या आहेत. 'लाल किताब' हा मूळ ग्रंथ उर्दू ग्रंथ असून त्याचे लेखक पंडित गिरधारीलाल शर्मा आहेत. सर्वसामान्य व्यक्तीला कमीतकमी खर्चात आणि सोपे तोडगे त्यांनी या पुस्तकात लिहिले. त्यांचा ग्रंथ हिंदीत आल्यानंतर उत्तर भारतात अत्यंत लोकप्रिय ठरला. या अंकात अभिनेत्री माधुरी दीक्षितबाबतची कुंडली मांडली आहे. तसेच 'अर्थशास्त्रीय समुद्र मंथन' या लेखात भारतीय अर्थव्यवस्थेतील ऐतिहासिक बदलाचे शिल्पकार आदींची माहिती दिली आहे. 'भास्कर पाटील-श्री संत गजानन महाराज शेगाव यांचा दूरदर्शी भक्त' या लेखात गजानन महाराज यांच्या भास्कर पाटील यांच्यावरील लेख आहे. हा संपूर्ण अंक वाचनीय आहे.




**ग्रहवेध**

संपादक- उदय मुळगुंद

मूल्य-१२५ रुपये

**साहित्य रंजन**

साहित्य,कला,पुराण,सामाजिक क्षेत्र तसेच राजकारणातील महत्वपूर्ण घडामोडींवर प्रकाश टाकणारे लेखन यंदाच्या साहित्य रंजन या दिवाळी अंकात आहे.

विविध कविता, साहित्य विषयांवरील लेख,वार्षिक राशी भविष्य आदींनी हा दिवाळी अंक सुंदररित्या सजला असून पौराणिक क्षेत्रातील या अंकाचे लेखन फार ऊल्लेखनीय आहे.




सदतिसावा गुण, सर्जिकल स्ट्राईक, अर्जुन अंगात आला, पाहुणा, महाभारतात तू तू मै मे आदी लेख मर्मस्पर्शी आहेत. दिवाळसणात वैचारिक खाद्य पुरविणारा हा एक ऊत्तम दिवाळी अंक असून कलाप्रतिभेचा हा एक सूक्ष्म शोध आहे असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.

**साहित्य रंजन**

संपादक - सत्यवान तेटांबे

मूल्य - १५० रूपये

TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India

Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724

Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com

CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० (१) अन्वये **याद्वारे सूचना देण्यात येते** की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबध्द करण्यात आलेले पर्पेच्युअल हायब्रिड सिक्युरिटीज्‌वरील वितरण थकीत खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | पर्पेच्युअल हायब्रिड सिक्युरिटीज (पीएचएस) | रोजीस नियत वितरण | वितरण देयाकरिताची नोंदीत तारीख |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ११ मे, २०११ रोजीस वाटप पीएचएस ११.५०% एकूण रु. ७७५ कोटी. (ISIN:INE081A08173) | दि. ११ नोव्हेंबर, २०१७ जे दि. १३ नोव्हेंबर, २०१७ रोजीस देय | ७ नोव्हेंबर, २०१७ |

**टाटा स्टील लिमिटेड**

सही/-

२३ ऑक्टोबर, २०१७

मुंबई

**श्रीम. अनिता कल्याणी**

अंतरिम कंपनी सचिव

TATA STEEL